# मुंबई विद्यापीठ

**कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] नुसार विद्यापीठ अध्यापकांना विद्यापरिषदेवर मतदार व उमेदवारी करीता अनुमती देणेबाबत.**

## परिपत्रक

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/४०**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] नुसार ८ अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे ०२ अध्यापक) विद्यापरिषदेवर निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३२(३)(छ)/32(3)(g) आणि संक्षिप्त नाव व प्रारंभ व्याख्या २(१८) आणि २(६१) खालीलप्रमाणे आहेत.

**कलम ३२(३)(छ)/32(3)(g)**

"अध्यापक गटाने आपल्यामधून निवडून द्यावयाचे पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक, त्यापैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल, परंतु प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल.

परंतु, या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल अशी महिला असेल."

**व्याख्या २(१८)**

**"अध्यापकांचा गट"** याचा अर्थ, जे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

**व्याख्या २(६१)**

**"अध्यापक"** याचा अर्थ, विद्यापीठाच्या कोणत्याही विभागातील संचालित, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल, प्राचार्य, परिसंस्थेचा संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्राचा संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचा संचालक, विद्यापीठाचा उप किंवा सहायक ग्रंथपाल व महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक, असा आहे.

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ अध्यापकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३२(३)(छ)/32(3)(g) नुसार आणि व्याख्या २(१८) व २(६१) यांची सांगड घालता विद्यापरिषदेकरीता मतदार व उमेदवारी नामनिर्देशनाकरीता कलम २८(२)(ध)/28(2)(s) अंतर्गत प्राप्त पात्र अर्जानुसार विद्यापीठ अध्यापकांना विद्यापरिषदेकरीता मतदार म्हणून व उमेदवारीकरीता नामनिर्देशन अर्ज भरण्याबाबत अनुमती देण्यात येत आहे.

सर्व विद्यापीठ विभाग प्रमुखांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ अध्यापकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : २० मे, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.